## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५३/२०१८ मधील नि.क्र.४३ वरील आदेश

(अंतरिम अर्ज क्र.२/१९ )

(CNR NO.MHSO06-0007692018)

प्रस्तुतच्या अर्जाने प्रतिवादी क्र.५ व ८ यांनी निशाणी ३३ येथील आदेश प्रमाणे खर्च रक्कम रुपये ४००/– भरण्यास परवानगी मिळण्यासाठी, दिनांक २१.०६.२०१९ रोजी निशाणी ३३ चा आदेश मागे घेण्याबाबत झालेला आदेश रदद होऊन पैसे भरण्यास परवानगी मिळण्यासाठी विनंती केली आहे.

२. वादींनी सदर अर्जास लेखी हरकत घेतली आहे. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी ३३ येथील आदेशाने प्रतिवादी क्र.५ व ८ यांना म्हणणे दाखल करण्यास खर्च आकारुन परवानगी देण्यात आली होती. सदर दिनांक ११.०४.२०१९ रोजीचा आदेशाची पूर्तता २१.०६.२०१९ पर्यंत न केल्याने तो आदेश मागे घेण्यात आला होता. अर्जाचा गुणवत्तेवर निकाल करण्याकरीता प्रतिवादी क्र.५ व ८ यांना पुन्हा संधी देऊन मी खालील आदेश करीत आहे.

### आदेश

१. अर्ज निशाणी ४३ अतिरिक्त खर्च रुपये २००/– आकारुन मंजुर केला आहे.

२. प्रतिवादी क्र.५ व ८ यांना निशाणी ३३ येथील खर्च रक्कम रुपये ४००+ या अर्जाचा खर्च रक्कम रुपये २००/– भरण्यास परवानगी दिली आहे.

३. दिनांक २१.०६.२०१९ रोजी निशाणी ३३ चा आदेश मागे घेण्याबाबत झालेला आदेश रदद करुन प्रतिवादी क्र.५ व ८ यांचे म्हणणे अभिलेखावर स्वीकारावे.

Sd/-

दि.२६.०९.२०१९

(रा. अ. सासने)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| Date | | 26-09-2019 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 26-09-2019 |
| Order uploaded on | : | 26-09-2019 |